संपूर्ण

# कालिदास-कथा

वि. वा. हडप

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**कालिदास कथा : वि. वा. हडप**

© सुरक्षित

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. नं.: ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
सौ. पद्मजा गोलिवडेकर, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, उद्यमनगर, कोल्हापूर.

**आवृत्ती**
जानेवारी, २०१३

**किंमत**
रुपये २२०/-

संपूर्ण

# कालिदास-कथा

वागर्थाविवसंपृक्तौ वागर्थः प्रतिपत्तये।
जगतः पितरौ वन्दे पार्वती–परमेश्वरौ ।।

# परिचय

केवळ संस्कृत वाङ्मयांतच नव्हे तर जागतिक वाङ्मयांत कविकुलगुरू कालिदासाचें स्थान अद्वितीय आहे. भारतीय रसिक त्याच्यावर बेहद्द खूष आहेतच, पण परदेशी पंडितही त्याची मुक्तकंठानें स्तुति करतात. परंतु बऱ्याचशा संस्कृत लेखकांप्रमाणें कालिदासाच्याही जीवनक्रमाबद्दल संपूर्ण विश्वसनीय माहिती जवळजवळ मिळतच नाहीं. कालिदास हा जन्मला केव्हां? त्याचे आई-बाप कोण? तो कोठें वाढला? तो कोठें राहात होता? किंवा त्याचा मृत्यु केव्हां झाला? याबद्दल आपल्याला अजुनहि अंधारांतच राहाणें भाग आहे. त्याच्या वाङ्मयांत त्यानें स्वत:बद्दल माहिती देण्याचें कटाक्षानें टाळलें आहे. त्याच्या जीवनावर प्रत्यक्ष झोत टाकणारी एखादीहि घटना त्याच्या वाङ्मयकृतींत नाहीं. त्यामुळें इतरांच्या उल्लेखावरून आणि त्याच्या वाङ्मयकृतींतील घटनांचा दूरान्वये संबंध जोडून आपण तर्कानें कालिदासाविषयीं माहिती जमा करूं शकतो.

कालिदासानें शाकुंतल, मालविकाग्निमित्र व विक्रमोर्वशीयम् हीं तीन नाटकें आणि मेघदूत, ऋतुसंहार, कुमारसंभव व रघुवंश हीं चार काव्यें लिहिलीं. 'कुंतेश्वरदौत्य' नांवाचें काव्यही कालिदासानें लिहिलें होतें, असे क्षेमेंद्र आपल्या 'औचित्यचर्चेत' लिहितो. पण त्या काव्याचा कोठलाहि भाग आज उपलब्ध नाही.

कालिदास महांकाळाचे, क्षिप्रा नदीचे आणि उज्जयनींतील बारीकसारीक गोष्टीचें इतकें सुंदर आणि सूक्ष्म वर्णन करतो कीं, त्यानें आपल्या आयुष्यांतील बरींच वर्षें खास उज्जयनींत घालविलेली असावी. तो जातीनें ब्राह्मण होता आणि दरबारी पद्धतीचीहि त्याला चांगलीच माहिती होती. तो शिवभक्त असला तरी कट्टर शैव नव्हता. त्याच्यावर लक्ष्मीचा वरदहस्त कायम होता आणि त्याला दारिद्र्याची झळ लागली नव्हती असें

दिसतें. त्यानें उत्तर भारताचाहि बराच प्रवास केला असावा. त्याची हिमालयाची वर्णनें प्रत्यक्ष पाहून केल्यासारखीं वाटतात.

त्याच्या पूर्वायुष्यांतच त्याला प्रसिद्धि मिळाली असावी असें वाटतें. त्याच्या शृंगारिक वर्णनावरून तो उच्छृंखल असावा असा प्रथमदर्शनी भास होतो, पण त्याच्या लिखाणांचें नीट परिशीलन केल्यास शृंगारिक वर्णनें ही त्याच्या सुखासीन वृत्तीची द्योतक आहेत हें लक्षांत येतें. त्याला वेद, उपनिषदें, भगवद्गीता, बादरायणाचा सांख्ययोग आणि वेदांतहि माहीत होता. त्याचप्रमाणें वैद्यकशास्त्र आणि किरकोळ खगोलशास्त्रहि त्याला माहीत होतें असें त्याच्या लिखाणावरून दिसतें.

कालिदासाचा काल कोणता याबद्दल विद्वानांचें आजून एकमत झालेलें नाही. इ. स. ६३४ मध्यें खोदलेल्या ऐहोळ लेखांत कालिदासाचा नांवानें उल्लेख आहे. ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकाच्या पूर्वीच्या कवींचा उल्लेख कालिदासानें केलेला आहे. त्यामुळें ख्रिस्तपूर्व पहिलें शतक ते इ. स. सातवें शतक या काळांत केव्हांतरी कालिदास होऊन गेला हें निश्चित ठरतें. निरनिराळ्या संशोधकांनीं कालिदासाचे निरनिराळे काळ दिलेले आहेत; आणि आपापल्या तर्काबद्दल पुरावे सादर केले आहेत. संस्कृतमध्यें लिहिलेल्या बुद्ध चरित्राचा लेखक अश्वघोष आणि कालिदास यांच्या लिखाणांत पुष्कळच सारखेपणा आढळतो. अश्वघोषाचा काल इ. स. ७८ हा निश्चित आहे. त्यापूर्वी शंभर सव्वाशें वर्षें, म्हणजे ख्रिस्तपूर्व पहिलें शतक हाच कालिदासाचा काल असावा असें वाटतें.

कालिदासाच्या नंतरच्या कवींमध्ये (दंडी, भवभूति वगैरे) समासयुक्त आणि पांडित्यप्रचुर शब्दयोजना आढळते. पण कालिदासाची शब्दरचना साधी व सुटसुटीत आहे, आणि त्याचें लिखाण भव्य व सौंदर्यवादी आहे.

भारतीयांना तर कालिदासाचा अभिमान आहेच; पण सर वुइल्यम जोन्ससारखा इंग्लिश पंडितहि 'इंडियन शेक्सपियर' असा त्याचा गौरव करतो. जर्मन कवि गटे यानेंहि त्याची बेफाम स्तुति केली आहे. त्याचप्रमाणे श्लेगेल, सर मॉनियर वुइल्यम्स आणि प्रा. लासेन यांनींहि कालिदासाची भरपूर स्तुतिसुमनें गायिलीं आहेत.

**१००६ सदाशिव**
**पुणे २**

**का. अ. जोशी**

# कथानुक्रम


- महाकवीची जीवन-कथा ... ९
- शकुंतला ... १७
- मालविका आणि अग्निमित्र ... ६४
- रघुवंश ... ९३
- विक्रम आणि उर्वशी ... १४३
- ऋतुसंहार (नल-दमयंती) ... १६३
- कुमारसंभव ... १८३
- मेघदूत ... २०५

## महाकवीची जीवनकथा

कालिदास हा भारतातील व्यास-वाल्मिकींनंतरचा सर्वश्रेष्ठ महाकवि होय. असें असतां याच्या संपूर्ण साहित्यसंपदेची तर राहोच, पण नांवगांव ठावठिकाणाचीहि निश्‍चित दाद आपणाला नाहीं! कालिदासाच्या कालाविषयीं अनेक कथा-दंतकथा प्रचलित आहेत. परंतु निश्‍चित पुराव्याच्या अभावीं त्यांचा पडताळा पाहणें अत्यंत अवघड किंबहुना अशक्य होऊन बसलें आहे. ख्रिस्तपूर्व पांचव्या शतकापासून इ. सनाच्या अकराव्या शतकापावेतोंच्या सुमारें सोळाशें वर्षांच्या काळांत आठ नऊ कवि कालिदास आणि त्यांना पदरी आश्रय देणारे चारपांच राजे विक्रमादित्य होऊन गेलेले सांपडतात. आणि काश्मीरपासून माळवा, विदर्भ, बंगाल एथवरचे देश सांगतात कीं, आपली भूमि ही कालिदासाची जन्मभूमि; कालिदास आपला. तथापि इतक्या दीर्घ मंथनानंतर अनेक प्रमाणभूत तज्ञांच्या मतें ख्रिस्तपूर्व पहिलें शतक हाच कालिदासाचा संभवनीय जन्मकाल असावा असें त्यांतल्या त्यांत अधिक संगतशीर वाटतें.

कालिदासाच्या जन्मकथेविषयींहि अनेक दंतकथा प्रचलित आहेत. त्यांतील कांही बल्लाळ कवीच्या 'भोज प्रबंध' ग्रंथांत नमूद आहेत. त्यांपैकीं त्यांतल्या त्यांत अधिक संभवनीय वाटणाऱ्या दंतकथेच्या आधारें ही चरित्रात्मक शोधकथा लिहिली आहे. हीच ग्रंथकथा अधिक संभवनीय वाटते याला कारण त्या कथेनुसार कालिदासाची निर्वाणभूमि आणि दहनभूमि सिलोन (सिंहलद्वीप)च्या दक्षिणेकडील माटार प्रांतांत किरिंदी नदीच्या मुखापाशीं तेथील रहिवासी आनुवंशिक परंपरेच्या माहितीवरून आजहि दाखवितात.

अगदीं गरीब ब्राह्मण आईबापांच्या पोटीं या बालकाचा जन्म दुःखावर डागण्या दिल्यासारखा पोरपणींच पोरकेपणा याच्या नशिबीं आलेला. तेव्हा त्याचें बाळपणचें पाळण्यांतलें नांव काय होतें कोण जाणें! पण कालिमातेवर त्याची अलोट भक्ति,

म्हणून लोक त्याला तेव्हांपासून कालिदास म्हणू लागले असावे. तेव्हांच्या तेथील ब्राह्मणांना कांहीं या पोरक्या ब्राह्मण मुलाची कींव आली नाहीं. पण आंधळ्याच्या गाई देव राखी म्हणतात, तशी त्या गांवच्या एका कनवाळू गवळ्याला त्याची कींव आली. त्यानें त्या अनाथ बालकाला गौळवाड्यांत आपल्या घरीं नेऊन त्याचें पोटच्या मुलाप्रमाणें लालनपालन केलें.

कालिदास पोरगा दिसायला जन्मापासूनच गोरागोमटा, राजबिंडा, तरतरीत, बुद्धिमान, प्रकृतीनेंहि चांगला धडधाकट. तशांत धर्माच्या पितृगृही मनमुराद गोरस पिऊन खेळण्या-हुंदडण्यांत सारें बाळपण गेलें. मग शरीरसंपदा दृष्ट लागण्यासारखी भरदार आणि सुंदर कां असणार नाहीं?

परंतु शरीरसंपदा अशी हेवा करण्याजोगी असली, तरी त्याचें सारें बाळपण अशिक्षित गवळ्यांच्या मुलांच्या संगतींत गेलेलें. गौळवाड्यांतील प्रत्यक्ष शिक्षण गौळी-गुराखी व्हायला उपयोगाचें. ब्राह्मणाची विद्वत्ता गौळवाड्यात कोठून येणार? पण एकलव्य जसा द्रोणगुरूंना धनुर्विद्येचें शिक्षण क्षत्रियकुमारांना देतांना चोरून पाहून पाहून धनुर्विद्या शिकला, तसे कालिदासाच्याहि मनावर बाळपणी आजूबाजूच्या ब्राह्मणांच्या विद्वत्तेचे आणि ज्ञानाचे वारेमाप संस्कार झाले असणें संभवनीय आहे. परंतु जरी असे संस्कार झाले असले, तरी ते किती? सुजली, करंगळी कितीहि सुजली तरी काही गगनाला जाऊन भिडत नाहीं.

असा हा कालिदास 'गवळी' लहानाचा मोठा झाला. लग्नायोग्य तरुण वर दिसू लागला. त्या देशच्या राजकन्येचें लग्न होण्याचें तेव्हां घाटूं लागलें. राजकन्येचें लग्न बऱ्याच दिवसांपासून घाटत होतें. तें कांहीं कुठें जमतां जमेना. कारण एक तर राजकन्या सुंदर, बुद्धिमान, विद्वान परंतु अत्यंत गर्विष्ठ होती. राजानें तिला जे वर सुचवावें, ते तिला क:पदार्थ वाटावे. त्यामुळें कोणी चांगला वर तिच्या वाऱ्यालाहि उभा राहीना. दुसरें या राजाचा स्वत: मंत्रीच राजकन्येला माळ घालू पाहत होता!

मंत्र्याला वाटलें, आतां कोणी चांगला वर या राजकन्येला वरायला उभा राहीना. त्याअर्थीं ही आपणाला माळ घालायला तयार होईल. परंतु त्याची ती अपेक्षा फोल ठरली. त्यानें तिला मागणी घातली; पण तिनें त्याला धुडकावून लावलें. त्यासरसा मंत्री सापाच्या शेपटीवर पाय पडून साप चिडावा तसा चिडला; आणि राजकन्येवर सूड घेण्याची संधी पाहू लागला.